<u>**प्रेसनोट दि.२४/०३/२०२३**</u>

<u>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेमार्फत दिनांक ०९/०३/२०२३ ते २३/०३/२०२३ दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत**</u>

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखली ही आयटी पार्क क्षेत्रे आहेत. सदर क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या नागरीकांची संख्याही मोठी असुन त्यांचेमार्फत दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर हा मोठ्या प्रमाणात होत आहे. नागरीक आपले ताब्यातील वाहन चालविताना रस्त्याचे नियमांकडे दुर्लक्ष करुन रॉंग साईडने वाहन चालवित जात असल्याने अपघातांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होवुन गंभिर व किरकोळ स्वरुपाचे अपघात होत आहेत. सदर अपघातामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत तसेच वित्तहानी होत असल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता पिंपरी चिंचवड वाहतुक शाखा कटीबद्ध आहे.

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने सह पोलीस आयुक्त मनोज लोहिया सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री संजय शिंदे सो तसेच पोलीस उपायुक्त काकासाहेब डोळे सो, विवेक पाटील सो. यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत दिनांक ०९/०३/२०२३ ते २३/०३/२०२३ दरम्यान रॉंग साईडने वाहन चालविणारे वाहन चालकांविरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात आली होती.








सदर मोहिमेदरम्यान रॉंग साईडने वाहन चालविणारे एकुण ४४२ वाहन चालकांवर मा. न्यायालयात खटले भरण्यात आले असुन या व्यतीरीक्त वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरीकांवर पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत इ चलन प्रणालीव्दारे दंडात्मक करवाई करण्यात येत असुन वाहनांवरील दंडाची रक्कम हि मोठ्या प्रमाणात अनपेड असल्याचे इ चलन

प्रणालीव्दारे दिसुन आल्याने इसीपीटी नाकाबंदी राबवुन ५२,७३,६५०/- रुपये एवढा दंड वसुल करण्यात आलेला आहे.

तरी यापुढे अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या हेडखाली वाहतुक विभागामार्फत कडक कारवाई करुन मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात येणार असल्याने नागरीकांनी त्यांचेवर होणारी न्यायालयीन कार्यवाही टाळावी असे अवाहन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामार्फत करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहा.पोलीस आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर